# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 11.09.2025** **वार- गुरुवार**

---

**मुरलीधर मोहोळ**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस येत्या 17 सप्टेंबर रोजी देशभरात विविध उपक्रमांनी साजरा होणार आहे. त्या निमित्तानं देशभरात सेवा पर्व साजरं करण्यात येणार आहे. पंतप्रधानांच्या वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला म्हणजे 16 सप्टेंबर रोजी पुण्यात, आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त अशा ड्रोन शोसह दिव्यांग सहाय्यता शिबीर आणि संगीत रजनीचं आयोजन करण्यात आलं आहे. सर परशुराम भाऊ महाविद्यालयाच्या मैदानावर, ज्योतीने तेजाची आरती, या कार्यक्रमातून पुणेकरांच्या वतीने पंतप्रधान मोदींना अमृतमहोत्सवी वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात येणार आहेत.

केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. अयोध्या आणि वाराणसीनंतर महाराष्ट्रात हा ड्रोन शो प्रथमच होणार आहे, यातून विकसित भारताच्या संकल्पाचं दर्शन पुणेकरांना घडणार आहे. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारची कामगिरी तसंच पुण्याच्या सामाजिक, सांस्कृतिक

आणि ऐतिहासिक मानबिंदूंचं दर्शनही यातून पुणेकरांना घडेल, असं मोहोळ म्हणाले.

**<u>पुणे म्हाडा</u>**

पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळाने 4 हजार 186 घरांसाठी सोडत जाहीर केली आहे. या सोडतीत पंतप्रधान आवास योजना, म्हाडा गृहनिर्माण योजना यासारख्या विविध योजनांमधून घरं उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यासाठी नोंदणी आणि अर्जविक्रीला आजपासून सुरुवात झाली. येत्या 1 नोव्हेंबरपर्यंत अर्ज स्वीकारले जातील, आणि 21 नोव्हेंबरला दुपारी 12 वाजता सोडतीचा निकाल जाहीर केला जाणार आहे.

**<u>आपले सरकार</u>**

राज्य शासनाच्या विविध विभागांच्या एकंदर 1 हजार 62 सेवा आता, प्रत्येक ग्रामपंचायतीत कार्यरत असलेल्या, “आपले सरकार सेवा केंद्रां”मार्फत नागरिकांना थेट उपलब्ध होणार आहेत. यासाठी ग्रामपंचायत पातळीवरील आपले सरकार सेवा केंद्र अधिकृतरीत्या स्वीकृत करण्यात आलं आहे. पुणे जिल्ह्यातील 1 हजार 87 ग्रामपंचायतींसाठी युजर आयडी आणि पासवर्ड मिळविण्याकरता जिल्हा परिषदे मार्फत महाआयटीला माहिती देण्यात आली होती. लवकरच ग्रामपंचायत पातळीवर सेवा केंद्र सुरू झाल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना विविध सेवांचा लाभ एका ठिकाणी मिळणार असून ग्रामपंचायतींच्या उत्पन्नातही वाढ होण्याची अपेक्षा आहे.

**Pcmc प्रभागरचना**

पिंपरी चिंचवड महापालिकेने जाहीर केलेल्या प्रारूप प्रभाग रचनेवरील हरकतींवर आज सुनावणी पार पडली. सुनावणी प्रक्रियेनंतर आवश्यक ते बदल करून अंतिम प्रारूप प्रभाग रचना राज्य शासनाला सादर करण्यात येणार आहे. संभाजीनगर चिखली, शाहूनगर, कासारवाडी, सांगवी परिसरातील प्रभागांमध्ये काही चुका झाल्याचं नागरिकांनी हरकतीतून सूचित केलं आहे.

**पुणेमनपा**

पुणे शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करणाऱ्या कर्मचाऱ्यांचं काम सुसह्य आणि सुरक्षित व्हावं यासाठी आगामी काळात आधुनिक तंत्रज्ञानावर भर देणार असल्याची माहिती पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे 'बृहन महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट अर्थात बार्टी आणि सोशल स्टडीज फाउंडेशन यांच्या वतीने 'शहरी स्वच्छता' या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाच्या समारोपप्रसंगी नवल किशोर राम बोलत होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र -कुलगुरू डॉ. पराग काळकर, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. या परिषदेत 400 व्यक्तींनी सहभाग नोंदवला.

**<u>एनएचएम संप मागे</u>**

राष्ट्रीय आरोग्य अभियानातील म्हणजे एनएचएम कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासमवेत झालेल्या बैठकीनंतर अखेर काल मागे घेण्यात आला. 19 ऑगस्टपासून एनएचएमच्या राज्यभरातील सुमारे 35 हजार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचं बेमुदत कामबंद आंदोलन सुरू होतं. विविध मागण्यांसाठी आरोग्य सेवेतील 16 संघटना प्रथमच एकत्रितपणे यात सहभागी  झाल्या होत्या. आरोग्यमंत्री आबिटकर यांनी काल एकत्रीकरण संघटनेशी सविस्तर चर्चा करून यावर तोडगा काढला.

**<u>पिक प्रात्यक्षिक</u>**

कृषी विभागानं 2025-26च्या रब्बी हंगामासाठी विविध पिकांच्या प्रात्यक्षिकांचं आयोजन केलं आहे. त्यासाठी शेतकऱ्यांच्या जवळपास पाच हजार हेक्टर क्षेत्राची निवड केली जाणार आहे, असं पुणे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी सांगितलं. शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाच्या आधारे उत्पादन वाढवण्याची, खर्च कमी करण्याची आणि शाश्वत शेतीकडे वाटचाल करण्याची संधी यामुळे मिळेल, असं ते म्हणाले.

**<u>गौरी गाडगीळ</u>**

पुण्याची आंतरराष्ट्रीय जलतरणपटू गौरी गाडगीळ यांची आंतरराष्ट्रीय पर्पल फेस्ट 2025साठी 'पर्पल दूत' म्हणून निवड झाली आहे. त्या 'बौद्धिक दिव्यांगत्व' प्रकाराचं प्रतिनिधित्व करतील. हा महोत्सव नऊ ते 12

ऑक्टोबर या कालावधीत गोव्यात होणार आहे. गोवा सरकारचं अपंग व्यक्ती आयुक्त कार्यालय, केंद्र सरकारचा दिव्यांग व्यक्ती सक्षमीकरण विभाग आणि संयुक्त राष्ट्र संघटना यांच्या वतीनं या महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे.

## <u>हवामान</u>

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 30 तर किमान तापमान 20 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल, त्याचबरोबर दुपारनंतर हलक्या पावसाचाही अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता,  ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**